शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परीषद जळगाव
Email-id-eoprizpjal@gmail.com

जा.क्र.शिक्षण/आस्था-७/आरआर/ 3 /२०२३ 8 — दिनांक :- 1 /12/2024 1-1-2024.

प्रति,

अध्यक्ष / सचिव

-----------------------------------

-----------------------------------

द्वारा,

**गटशिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती सर्व जि.जळगांव**

विषयः- शिक्षक पदभरती २०२२
शिक्षक पदभरतीसाठी पवित्र पोर्टलवर रिक्त पदांची जाहिरात देण्याची कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ :- 1. शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९ दि.१०/११/२०२२ व दि.१३/१०/२०२३
२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय पुणे यांचेकडील पत्र क्रं शिसं/जाहिरात-पदभरती/पवित्र पोर्टल/टे-4/5491 दिनांक 27/10/202
3.मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्रं आस्था/प्राथ-106/पवित्र-पोर्टल/जाहिरात/2023/7758 दिनांक 15/12/2023
4.मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व मा.प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग यांनी दिनांक 18/12/2023 रोजी घेतलेल्या ऑनलाईन आढावा बैठकीतील सुचना
5. या कार्यालयाचे पत्र क्रं शिक्षण/आस्था-7/आरआर/776/2023 दिनांक 27/10/2023

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास संदर्भ क्रं 5 नुसार खाजगी शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांतील रिक्त पदे भरण्यासाठी https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर आरक्षण व विषय नोंद करुन जाहिरात देण्याची सुविधा दिनांक १६/१०/२०२३ पासून देण्यात आलेली असुन आपल्या स्तरावरुन योग्य कार्यवाही करणेबाबत अवगत केले आहे.

संदर्भ क्रं 3 नुसार मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सदरची कार्यवाही करण्यासाठी आवश्यक असणारी आरक्षणानिहाय रिक्त पदे तसेच गट,विषयनिहाय रिक्त पदांची माहिती पडताळणी करुन जाहिरात देण्यासाठी तयार ठेवण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने शिक्षक पदभरती विनाविलंब होण्यासाठी पवित्र पोर्टलवरील सुचनानुसार तात्काळ ऑनलाईन जाहिरात देण्यासाठी आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावर करुन संदर्भ क्रं 2 व संदर्भ क्रं 5 नुसार सदर ऑनलाईन जाहिरात मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या लॉगिनला ऑनलाईन फॉरवर्ड करावी व ऑफलाईन प्रस्ताव मान्यतेसाठी या कार्यालयात श्री कैलास आंनदा ठोके,वरिष्ठ सहाय्यक यांचेकडेस सादर करावा. म्हणजे सदर जाहिरात मान्य करता येईल.

(विकास म.पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद,जळगांव

प्रत:- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व
2/- उपरोक्त विषयाबाबत सर्व शिक्षण संस्थाचालक व मुख्याध्यापक यांना अवगत करावे.